# मेट्रो-३ च्या पहिल्या टप्प्याचे ९७ टक्के काम पूर्ण

**मुंबई :** मुंबईतील पहिल्या भूमिगत कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गाचा आरे ते बीकेसी हा पहिल्या टप्प्याचे काम सुमारे ९७ टक्के पूर्ण झाले आहे.

नुकतीच मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने सर्व स्टेशन्सची तपासणी केली आहे. त्यानुसार पुढील आठवड्यापर्यंत मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांना अंतिम चाचणीसाठी एमएमआरसी आमंत्रित करण्यासाठी अर्ज करणार आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भूमिगत मेट्रोचे काम वेगाने सुरू आहे. आरे ते बिकेसी या पहिल्या टप्प्यातील मेट्रो सेवा सुरू करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन प्रयत्नशील आहे. पहिल्या टप्प्यातील आरडीएसओ चाचण्या पूर्ण झाल्या आहेत. पहिल्या टप्प्यातील ९७ टक्के कामे पूर्ण झाली आहे.